५. या आदेशाचे उल्लघंन करणारी कोणतीही व्यक्ती भारतीय न्याय संहीता २०२३ च्या कलम, २२३ अन्वये दंडनीय असेल.

६. सर्व संबधितांना वैयक्तीकरित्या नोटीस बजावली जावू शकत नसल्यामुळे याद्वारे एकतर्फी आदेश पारित करण्यात आला आहे. लोकांच्या माहितासाठी प्रसार माध्यमांद्वारे आणि सर्व पोलीस ठाणे सर्व स.पो.आ. सर्व पो.उप.आ. महानगर पालीका बॉर्ड ऑफीस, तहसील ऑफीसच्या नोटीस बोर्डवर प्रती चिकटवून प्रकाशित केले जाईल.

सदरचा आदेश माझ्या सही शिक्यानिशी आज दिनांक दि. /०१/२०२६ रोजी दिला आहे.

(प्रविण पवार) भा.पो.से.
पोलीस आयुक्त, छत्रपती संभाजीनगर

६

पोलीस आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांजकडून

भारतीय नागरीक सुरक्षा संहीता २०२३ चे कलम १६३ प्रमाणे प्रतिबंधक आदेश.

आदेश :-

गोपनिय जा.क्र.विशा-३/आदेश/छ.संभाजीनगर/२०२६-५१९ छ. संभाजीनगर, दि. १३/०२/२०२६ :- ज्या अर्थी भारतीय विमानपतन प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर यांनी माझ्या असे निदर्शनास आणून देण्यात आले आहे की, पोलीस आयुक्त छत्रपती संभाजीनगर कार्यक्षेत्रात विमानतळाच्या आजुबाजुच्या परीसरात अनेक फॉर्म हाउस, मंगल कार्यालय येथील विवाह सोहळा आणि विविध सामाजिक, धार्मीक कार्यक्रम सण उत्सव मध्ये लेझर लाईट्स/बीम लाईट्स वापरतात. लेझर लाईट्स बीम लाईट्स मुळे विमानाच्या ऑपरेशन मध्ये गंभीर समस्या निर्माण होउ शकतात. पायलेटच्या दुष्टीत व्यत्यय आणतात. आणि लॅडींग व टेकअप करण्यापुर्वी पायलेटचे लक्ष विचलीत होउन एखाद्या वेळीस गंभीर हवाई वाहतूक दुर्घटना होउ शकते. त्यामुळे विमानातील प्रवाशांची सुरक्षा धोक्यात येवू शकते. तसेच छत्रपती संभाजीनगर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात विविध सामाजिक, धार्मीक कार्यक्रम तसेच सण उत्सव कार्यक्रमाच्या वेळेस आकाशामध्ये प्रखर लेझर लाईट्स/ बीम लाईट्सचा वापर करण्यात येते.

माझी अशी खात्री पटली आहे की अशा प्रखर बीम लाईट व लेझर बीम लाईट मुळे वैमानिकाचे डोळे दिपुन दुर्घटना होण्याची शक्यता आहे.

भारतीय नागरिक सुरक्षा संहीता २०२३ चे कलम १६३ अन्वये पोलीस आयुक्त यांना विशेष कार्यकारी दंडाधिकारी म्हणून कलम १६३ चे विशेष अधिकार प्रदान केलेले आहेत.

त्याअर्थी **मी प्रविण पवार पोलिस आयुक्त छत्रपती संभाजीनगर** मला भारतीय नागरीक सुरक्षा संहीता २०२३ चे कलम १६३ प्रमाणे प्राप्त झालेल्या अधिकारान्वये असा आदेश देतो की

छत्रपती संभाजीनगर विमानतळच्या साधारणपणे १५ कि.मी. अंतराच्या वायुक्षेत्र (Air Field) परीघामध्ये (Radius) व छत्रपती संभाजीनगर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात नमूद कृत्यावर प्रतिबंध करण्यात येत आहे.

कोणत्याही व्यक्तीने किंवा कार्यक्रमाचे आयोजकांनी लेझर लाईट्स बीम लाईट्स आकाशात सोडू नये

सदरील आदेश दिनांक १५/०२/२०२६ पासून दि. १५/०४/२०२६ पावेतो ६० दिवसा करीता अंमलात राहील.

सदरच्या सुधारीत आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भारतीय न्याय संहीता कलम २२३ प्रमाणे शिक्षेस पात्र राहील. सदरचा आदेश मी, माझ्या सहीनिशी आज दि. /०२/२०२६ रोजी दिला आहे.

सर्व पोलीस उप आयुक्त, सर्व सहाय्यक पोलीस आयुक्त सर्व पो.स्टे. प्रभारी अधिकारी, यांना सुचित करण्यात येते की, सदरचा प्रतिबंधक आदेश सर्व संबंधितांना वैयक्तिक रित्या बजावणे शक्य नसल्याने व त्यांना अवगत करणे आवश्यक असल्याने आपण सदर प्रतिबंधात्मक आदेशास प्रसिध्दी माध्यमे, सर्व पोलीस ठाणे, पोलीस अधिकारी कार्यालय, छावणी मंडळ, महानगर पालिका, मध्यवर्ती बसस्थानक, रेल्वेस्टेशन, मुख्य बाजारपेठा, सार्वजनिक वाचनालये इत्यादी महत्वाच्या ठिकाणच्या सुचना फलकांवर चिटकावून प्रसिध्दी द्यावी. त्याचप्रमाणे पोलीस अधिकारी यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम १६३ प्रमाणे प्रसिध्दीची कार्यवाही करावी.

सदर आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी आम्ही आमचे अधिनस्थ परिमंडळाचे सर्व पोलिस उप-आयुक्त, विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना प्राधिकृत करीत आहोत.

(प्रविण पवार) भा.पो.से.
पोलीस आयुक्त,छत्रपती संभाजीनगर

७

अप्पर जिल्हादंडाधिकारी बीड यांजकडून

वाचाः- १. मा. पोलिस अधिक्षक, बीड यांचे पत्र जा. क्र. जिविशा/प्रतिबंधक मनाई आदेश/२०२५-४९७९ बीड दि ०४/०८/२०२५

२. महाराष्ट्र पोलिस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३)

महाराष्ट्र पोलिस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) प्रमाणे मनाई आदेश लागू करणे बाबत :-

आदेश

क्र.२०२५/गृह विभाग/प्र. कार्यवाही/१/१/म.पो.अ. कलम १९५१ ज्याअर्थी, मा. पोलीस अधिक्षक, बीड यांनी बीड जिल्हयात कायदा व सुव्यवस्थेबाबत दिनांक २८/०७/२०२५ पासून श्रावण मास प्रारंभ झाला आहे. दि. ०९/०८/२०२५ रोजी रक्षाबंधन, दि. १५/०८/२०२५ रोजी स्वतंत्रदिन व दि. १६/०८/२०२५ रोजी गोपाळकाला येत असून आरक्षण व इतर मागणीच्या अनुषंगाने आमरण उपोषण होण्याची शक्यता आहे. तसेच काही राजकीय पक्ष, संघटनेच्या वतीने त्यांचे न्याय, मागण्यासाठी स्वातंत्र्यादिनी विविध प्रकारचे निदर्शने, आंदोलने, उपोषण, मोर्चे इत्यादी होण्याची शक्यता आहे. यामुळे अचानक घडणारे घटनावरुन व किरकोळ कारणावरुन तणाव निर्माण होवून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नसले बाबत नमूद केले आहे. तसेच जिल्हयात शांतता व सुव्यवस्था अबाधीत राहावी या करीता म.पो.अधि.- १९५१ चे कलम ३७ (१) (३) प्रमाणे जमावबंदी आदेश लागू करणे अत्यंत आवश्यक असून दि. १०/०८/२०२५ रोजीचे ००.०१ वाजेपासून ते दि. २४/०८/२०२५ चे २४.०० वाजेपर्यंत चे काळात बीड जिल्हयात म. पो.अधि. चे कलम ३७ (१) (३) लागू करणेस विनंती केली आहे.

आणि ज्याअर्थी, सदर कालावधीकरीता महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७ (१) (३) अन्वये काढण्यात येणाऱ्या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने आंदोलने, धरणे या सारखे आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येता येणार नाही" या निर्बंधाचा समावेश करणे बाबत विनंती केली आहे.

आणि ज्याअर्थी, मा. पोलीस अधीक्षक, बीड यांचे अहवालावरुन जिल्हयात कायदा व सुव्यवस्था अबाधीत राखण्यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३१ (१) (३) प्रमाणे जिल्हयात प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्याची माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) प्रमाणे मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन मी शिवकुमार स्वामी, अपर जिल्हादंडाधिकारी, बीड या आदेशाद्वारे असे निर्देश देत आहे की, शासकीय कर्तव्य पार पाडणाऱ्या कर्मचाऱ्याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी किंवा त्याच्या जवळपास खालील गोष्टी करण्यास मनाई करण्यात येत आहे.

१. शस्त्र, सोटे, काठी, तलवार, बंदूक जवळ बाळगणार नाहीत.

२. लाठया, काठया, शारिरीक इजा होण्यास कारणीभूत ठरतील, सहज हाताळता येतील, अशा वस्तू, साहित्य बाळगणार नाहीत.

३. कोणतेही दाहक पदार्थ किंवा स्फोटके जवळ बाळगणार नाहीत.

४. दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे किंवा फोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे गोळा करुन ठेवणार नाहीत, बाळगणार नाहीत किंवा तयार करणार नाहीत.

५. प्रक्षोभक भाषणे, अंगविक्षेपण, विडंबनात्मक नकला करणार नाही. सभ्यता, नीतिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी घोषणा फलक किंवा इतर कोणत्याही वस्तू, साहित्य जवळ बाळगणार नाहीत.

६. जाहिरपणे घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे किंवा कोणतीही कृती जी देशाच्या संविधनातील मुल्यांच्या विरुध्द असेल किंवा देशाचा मान व सार्वभौमत्व यांना इजा पोहचविणारी असेल किंवा सार्वजनिक सुरक्षा आणि सामाजिक सलोखा यांना हानी पोहचविणारी असेल अशी कृती करणार नाहीत. तसेच जाहिरपणे प्रक्षोभक भाषण व असभ्य वर्तन करणार नाहीत.

७. व्यक्ती, शव, प्रेत, आकृती किंवा त्याच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन करणार नाहीत.

८. पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येता येणार नाही किंवा मिरवणुक, मोर्चा काढता येणार नाही.

सदर आदेश बीड जिल्हयाच्या हद्दीत दिनांक **१०/०८/२०२५** रोजीचे **००.०१** वाजेपासून ते दि. **२४/०८/२०२५** चे **२४.००** वाजेपर्यंत लागू राहतील. तसेच विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूकीस लागू राहणार नाहीत. अशी कोणतीही मनाई राज्य शासनाच्या मंजुरी शिवाय १५ दिवसांपेक्षा जास्त मुदतीपर्यंत अंमलात राहणार नाही. तसेच या आदेशाचे पालन करुन कोणताही मोर्चा, सभा, मिरवणूक व तत्सम कोणतीही कृती करण्यासाठी त्या क्षेत्रातील सक्षम पोलीस अधिकाऱ्याची पूर्वमान्यता घेणे आवश्यक असेल.

सदर आदेश माझ्या सही शिक्यानिशी दिला.

स्वाक्षरीत/-
अपर जिल्हादंडाधिकारी, बीड

८

अप्पर जिल्हादंडाधिकारी बीड यांजकडून

वाचाः- १. मा. पोलिस अधिक्षक, बीड यांचे पत्र जा. क्र. जिविशा/प्रतिबंधक मनाई आदेश/२०२५-५३२८ बीड दि २०/०८/२०२५

२. महाराष्ट्र पोलिस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३)

महाराष्ट्र पोलिस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) प्रमाणे मनाई आदेश लागू करणे बाबत :-

आदेश

क्र.३६०/२०२५/गृह विभाग/प्र. कार्यवाही/१/१/म.पो.अ. कलम १९५१ ज्याअर्थी, मा. पोलीस अधिक्षक, बीड यांनी बीड जिल्हयात कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने दि. २७/०८/२०२५ श्रीगणेशोत्सव स्थापना, दिनांक ०६/०९/२०२५ रोजी विसर्जन मिरवणुका, दि. ०५/०९/२०२५ रोजी ईद-ए-मिलाद मिरवणुका असून काही राजकीय पक्ष, संघटनेच्या वतीने त्यांचे न्याय, मागण्यांसाठी विविध प्रकारचे निदर्शने, आंदोलने, उपोषण, मोर्चे इत्यादी होण्याची शक्यता आहे. यामुळे अचानक घडणारे घटनावरुन व किरकोळ कारणावरुन तणाव निर्माण होवून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नसले बाबत नमूद केले आहे. तसेच जिल्हयात शांतता व सुव्यवस्था अबाधीत राहावी या करीता म.पो.अधि.-१९५१ चे कलम ३७ (१) (३) प्रमाणे जमावबंदी आदेश लागू करणे अत्यंत आवश्यक असून दि. २६/०८/२०२५ रोजीचे ००.०१ वाजेपासून ते दि. ०९/०९/२०२५ चे २४.०० वाजेपर्यंत चे काळात बीड जिल्हयात म. पो.अधि. चे कलम ३७ (१) (३) लागू करणेस विनंती केली आहे.

आणि ज्याअर्थी, सदर कालावधीकरीता महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७ (१) (३) अन्वये काढण्यात येणाऱ्या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने आंदोलने, धरणे या सारखे आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येता येणार नाही" या निर्बंधाचा समावेश करणे बाबत विनंती केली आहे.

आणि ज्याअर्थी, मा. पोलीस अधीक्षक, बीड यांचे अहवालावरुन जिल्हयात कायदा व सुव्यवस्था अबाधीत राखण्यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३१ (१) (३) प्रमाणे जिल्हयात प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्याची माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) प्रमाणे मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन मी शिवकुमार स्वामी, अपर जिल्हादंडाधिकारी, बीड या आदेशाद्वारे असे निर्देश देत आहे की, शासकीय कर्तव्य पार पाडणाऱ्या कर्मचाऱ्याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी किंवा त्याच्या जवळपास खालील गोष्टी करण्यास मनाई करण्यात येत आहे.

१. शस्त्र, सोटे, काठी, तलवार, बंदूक जवळ बाळगणार नाहीत.

२. लाठया, काठया, शारिरीक इजा होण्यास कारणीभूत ठरतील, सहज हाताळता येतील, अशा वस्तू, साहित्य बाळगणार नाहीत.

३. कोणतेही दाहक पदार्थ किंवा स्फोटके जवळ बाळगणार नाहीत.

४. दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे किंवा फोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे गोळा करुन ठेवणार नाहीत, बाळगणार नाहीत किंवा तयार करणार नाहीत.

५. प्रक्षोभक भाषणे, अंगविक्षेपण, विडंबनात्मक नकला करणार नाही. सभ्यता, नीतिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी घोषणा फलक किंवा इतर कोणत्याही वस्तू, साहित्य जवळ बाळगणार नाहीत.

६. जाहिरपणे घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे किंवा कोणतीही कृती जी देशाच्या संविधनातील मुल्यांच्या विरुध्द असेल किंवा देशाचा मान व सार्वभौमत्व यांना इजा पोहचविणारी असेल किंवा सार्वजनिक सुरक्षा आणि सामाजिक सलोखा यांना हानी पोहचविणारी असेल अशी कृती करणार नाहीत. तसेच जाहिरपणे प्रक्षोभक भाषण व असभ्य वर्तन करणार नाहीत.

७. व्यक्ती, शव, प्रेत, आकृती किंवा त्याच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन करणार नाहीत.

८. पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येता येणार नाही किंवा मिरवणुक, मोर्चा काढता येणार नाही.

सदर आदेश बीड जिल्हयाच्या हद्दीत दि. **२६/०८/२०२५** रोजीचे **००.०१** वाजेपासून ते दि. **०९/०९/२०२५** चे **२४.००** वाजेपर्यंत लागू राहतील. तसेच विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूकीस लागू राहणार नाहीत. अशी कोणतीही मनाई राज्य शासनाच्या मंजुरी शिवाय १५ दिवसांपेक्षा जास्त मुदतीपर्यंत अंमलात राहणार नाही. तसेच या आदेशाचे पालन करुन कोणताही मोर्चा, सभा, मिरवणूक व तत्सम कोणतीही कृती करण्यासाठी त्या क्षेत्रातील सक्षम पोलीस अधिकाऱ्याची पूर्वमान्यता घेणे आवश्यक असेल.

सदर आदेश माझ्या सही शिक्यानिशी दिला.

स्वाक्षरीत/-
अपर जिल्हादंडाधिकारी, बीड

९

उपजिल्हाधिकारी भूंसपादन जायकवाडी प्रकल्प छत्रपती संभाजीनगर यांजकडून

अधिसुचना

कलम ११ (१)

१. भुसंपादन, पुनर्वसन व पुनस्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३

२. मा.जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर यांचे आदेश जा.क्र. २०१८/ आरबीडेक्स-४/समन्वय/भूसं/सिआर-२६ दिनांक १४.०८.२०१८

ज्याअर्थी भुमी संपादन पुनर्वसन व पुनःस्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ (३०चा २०१३) च्या कलम-३ मधील अधिकारानुसार महाराष्ट्र शासनाने, महसुल व वनविभाग अधिसुचना क्रमांक एमआयएस-११/२०१४/सी.आर.७७/ए-२ दिनांक १९ जानेवारी २०१५ (यापुढे ज्याचा उल्लेख उक्त अधिसुचना असा केला आहे) द्वारे भुमीसंपादन, पुनर्वसन क पुनःस्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ (२०१३ चा ३०) (यापुढे याला सदरहु अधिसुचना संबोधण्यात यावे) अन्वये सार्वजनिक प्रयोजनार्थ जमीन संपादन करतांना सदरहू कायदयाच्या कलम ३ मधील पोटकलम (ए-झेड) नुसार जिल्हयातील ५०० हेक्टर पेक्षा अधिक नसलेल्या शासनाच्या वतीने समुचीत शासन म्हणून घोषित करण्यात आले आहे.

आणि ज्याअर्थी, या अधिसुचनेनुसार जिल्हाधिकारी यांना शासनाच्या वतीने समुचीत शासन म्हणुन घोषीत करण्यात आले आहे. त्याअर्थी अनुसुची-१ मध्ये दर्शविलेल्या जमीनी (यापुढे त्यांचा उल्लेख उक्त भुमी असा करण्यात येईल) असनुसुची-२ मध्ये नमुद केलेल्या सार्वजनिक प्रयोजनाकरिता आवश्यक आहे किया आवश्यक असल्याचा संभव आहे. (यापुढे ज्याचा उल्लेख उक्त सार्वजनिक प्रयोजन असा करण्यात येईल) याबाबत जिल्हाधिकारी औरंगाबाद यांची समुचीत शासन म्हणून खात्री झाल्यामुळे सदरहू कायद्याच्या कलम -११ च्या पोटकलम (१) नुसार सार्वजनिक कामाच्या प्रयोजनासाठी जमीन संपादन करण्यात येते, असे अधिसुचित करणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी, सदरहू भुमी संपादन कायद्यानुसार सार्वजनिक प्रयोजनार्थ भुमी संपादित करतांना भूधारकास विस्थापित करण्याचे कारण सोप्रत जोडलेल्या अनुसुची-३ मध्ये नमुद केले आहे.

आणि ज्याअर्थी, भुमी संपादन कायद्यांतर्गत सार्वजनिक प्रयोजनार्थ भुमी संपादन करतांना सामाजिक परिणाम निर्धारणाचा सारांश सोबत जोडलेल्या अनुसुची-४ मध्ये नमुद केलेला आहे. आणि ज्याअर्थी, भुमी संपादन कायद्याचे कलम ४३ पोटकलम (१) नुसार विस्थापिताचे पुनर्वसन आणि पुनःस्थापना करण्याकरिता सोबत जोडलेल्या अनुसुची-५ मध्ये प्रशासकाचे विवरण नमुद केलेले आहे. (प्रशासकाची नियुक्ती आवश्यक असल्यास अनुसुची-५ मध्ये माहिती देणे आवश्यक आहे.)

त्याअर्थी आता सदरहू कायद्याच्या कलम-११ येथे पोटकलम (४) नुसार अधिसुचना प्रसिध्द केल्याच्या दिनांकापासुन सदरहू भुमी कायद्याच्या प्रकरण-४ खाली कार्यवाही पुर्ण होईपर्यंत कोणतीही व्यक्ती उपत जमिनीचा अथवा जमिनीच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा कोणताही व्यवहार करविणार नाही किंवा अश्या जमिनीवर कोणताही बोजा निर्माण करणार नाही

परंतु जिल्हाधिकारी अशाप्रकारे अधिसुचित केलेल्या भुमीच्या मालकांने अर्ज केल्यावर लेखी नौदवावयाच्या विशेष परिस्थितीमध्ये या पोट कलमाच्या अंमलबजावणी मधुन अशा भुमी मालकास सुट देऊ शकेल.

परंतू, आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे जाणीवपुर्वक उल्लंघन केल्यामुळे तिला सोसाव्या लागलेल्या कोणत्याही नुकसानीची अथवा क्षतिची जिल्हाधिकारी व्दारे भरपाई देण्यात येणार नाही.

पुन्हा असे घोषित करण्यात येते की, सदरहू भुमी संपादन कायद्याचे कलम ११ च्या पोट कलम (५) अन्वये जिल्हाधिकारी हे भूमीसंपादन पुनर्वर्सन व पुनःस्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २०१४ (यापुढे ज्यांचा उल्लेख उक्त नियम असा करण्यात येईल) चे नियम १० मधील उपनियम (३) अन्वये भूमी अभिलेख अद्यावत करण्याचे कामी हाती घेतील.

आणि म्हणून त्याअर्थी समुचीत शासन म्हणून जिल्हाधिकारी सदरहू कायद्याचे कलम ३ पोटकलम (ग) अन्वये उपजिल्हाधिकारी भूसंपादन जायकवाडी प्रकल्प औरंगाबाद यांना पदनिर्देशित करित आहे.

अनुसूची -१

भूमी वर्णन : मोजणी प्रमाणे

गावाचे नाव : मौजे भगुर **ता.** वैजापुर **जि.** छ.संभाजीनगर

अ.क्र.	**सर्व्हे नंबर / गट नंबर**	**परिशिष्ट १६ प्रमाणे क्षेत्र (हे.आर.)**
१	२८०	१.१८
२	२८०	१.२२
३	२८०	०.५५
४	२८०	०.६३
५	२८०	०.५५
	एकुण	**४.१३**

संपादनाचे प्रयोजन : पाझर तलाव क्र. ७ मौजे भगुर, ता. वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर अे.आर.क्र. ०३/०५

अनुसूची -२

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाचे विवरण :- याप्रकल्पाद्वारे जमिनीस सिंचनाचा फायदा होणार आहे.

प्रकल्पाचे नाव :- पाझर तलाव क्र. ७ मौजे भगुर, ता. वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर अे.आर.क्र. ०३/०५

प्रकल्पाच्या कामाचा तपशिल :- पाझर तलाव क्र. ७ मौजे भगुर, ता. वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर अे.आर.क्र. ०३/०५

सामाजिक फायदे :- याप्रकल्पाद्वारे जमिनीस सिंचनाचा फायदा होणार आहे.

अनुसूची -३

बाधीत व्यक्तीचे विस्थापनाच्या आवश्यकतेसाठी कारणे :- विस्थापनाची आवश्यकता नाही.

सबब माहिती : निरंक

अनुसूची - ४

सामजिक परिणामाचे निर्धारण गोषवारा :-

(सामाजिक परिणामाचे निर्धारण करणाऱ्या यंत्रणेने दिल्याप्रमाणे)

१. महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक १३.०३.२०१५ नुसार उक्त अधिनियमाचे प्रकरण २ व ३ मधील तरतुदी प्रमाणे लागु करण्यापासुन सुट प्राप्त.

२.महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक २६.०४.२०१८ नुसार उक्त अधिनियमांचे प्रकरण २ व ३ मधील तरतुदी लागु करण्यापासुन सुट प्राप्त

अनुसूची -५

१. नियुक्त केलेल्या प्रशासकाबाबत माहिती

ज्या अधिकाऱ्याची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे त्याचे पदनाम :- आवश्यकता नाही.

२. सबब माहिती निरंक

३. प्रशासकाचे कार्यालयाचा पत्ता :- निरंक

प्रशासकाची नियुक्ती ज्या अधिसुचेनेनुसार झाली आहे त्याचा तपशील - निरंक

टिप :- उक्त जमिनीचा / जमिनीच्या योजनेचे (प्लॅनचे) निरीक्षण उपजिल्हाधिकारी भूसंपादन जायकवाडी प्रकल्प छत्रपती संभाजीनगर यांच्या कार्यालयात करता येईल.

दिनांक : / ०४ /२०२६.

ठिकाण : छत्रपती संभाजीनगर

(एकनाथ कांता दत्तात्रय बंगाळे)
उपजिल्हाधिकारी
भूंसपादन जायकवाडी प्रकल्प
छत्रपती संभाजीनगर.

१०

सहायक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी भोकरदन. यांजकडून

भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अन्वये कलम १९ (१) ची

अधिसुचना

क्रमांक २०२२/उविअ/भुस/सम-२/सिआर-७७/२२.- दिनांक २१/०७/२०२२. ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या जालना जिल्ह्याच्या जिल्हाधिका-याने, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) यात यापुढे ज्याचा निर्देश **उक्त अधिनियम** असा केला आहे, यांच्या कलम ११ च्या पोट कलमाव्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, अधिसुचना, **दिनांक ३०/०१/२०२६ अन्वये प्रारंभिक अधिसूचना** काढली आहे व शासन राजपत्रामध्ये **दिनांक १२/०२/२०२६** रोजी प्रसिध्दी देण्यात आली आहे.

त्याव्दारे असे अधिसुचित केले आहे की, या सोबत जोडलेल्या **अनुसूचि एक** मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेल्या जमिनीची, **अनुसूची दोन** मध्ये अधिक तपशिलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे. किंवा त्यांची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

जालना जिल्हयातील जिल्हाधिकारी जालना **कलम १५ च्या पोटकलम (२)** अन्वये दिलेला अहवाल,कोणता ही असल्यास,विचारात घेतल्या नंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीनीची संपादीत करण्याची आवश्यकता आहे, या बाबत त्याची खात्री पटली आहे म्हणुन,उक्त अधिनियमाच्या **कलम १९ च्या पोटकलम (१)** च्या तरतुदी मध्ये उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीनीची आवश्यकता आहे. असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

ज्याअर्थी, **अनुसूची तीन** मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधीत कुटूंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतच्या प्रयोजनासाठी पुनर्वसन क्षेत्र म्हणुन निर्धारीत केले असल्याचे या द्वारे घोषित केले असून पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेच्या सारांश **अनुसूची चार** मध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या **कलम ३ (छ)** अन्वये सुचीत शासन असलेला जिल्हाधिकारी हे उक्त अधिनियमा मध्ये जिल्हाधिकारी यांची कर्तव्ये पार पाडण्यासाठी **उपविभागीय अधिकारी भोकरदन** यांना अधिसुचना काढण्यापुर्वी पदनिर्देशित करीत आहे.

अनुसूची -१

(जमीनीचे वर्णन)

गावाचे नावः- पा.त.क्र.११ मौजे-गोषेगांव ता. भोकरदन जि. जालना

अ.क्र.	भुसंपादन किंवा गट क्रमांक	मोजणी प्रमाणे क्षेत्र (हे.आर.मध्ये)
१	२९२	०.२८
२	२९२	०.१६
३	२८५	०.०७
४	२८४	०.२१
	एकुण	०.७२

अनुसूची -२

प्रकल्पाचे नांव : पाझर तलाव क्र. ११ मौ. गोषेगाव ता. भोकरदन जि. जालना या प्रकल्पा करीता

प्रकल्पकार्याचे वर्णन : पाझर तलाव क्र. ११ मौ. गोषेगाव ता. भोकरदन जि. जालना येथील जमीन पाझर तलाव करिता संपादना बाबत.

समाजास मिळणारा लाभ : या प्रकल्पामुळे **मौ. गोषेगाव ता. भोकरदन जि. जालना** येथील जमीन ओलीतीखाली येणार आहे. या प्रकल्पामुळे त्या लाभक्षेत्रातील जमीनीचे पाणीपातळी भरपूर प्रमाणत वाढ होणार आहे तसेच गावाच्या पिण्याचा पाण्याचा जनावराच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागणार आहे. या पाझर तलावाच्या कामामुळे रोजगारांची संधी मिळणार आहे. तसेच संपादना क्षेत्रालगतची जमीन ओलीत होणार असुन प्राप्त होणाऱ्या उत्पन्नात लक्षणी वाढ होणार आहे व पर्यायाने खेड्यातील जीवनमानामध्ये सुधारणा होणार आहे.

अनुसूची -३

बाधीत व्यक्तीचे विस्थापन कररण्यात भाग पाडणारी कारणे – सदरचा प्रकल्प हा सिंचन क्षेत्रातील जमीन अधीकाधीक फायदेशीर उत्पन्न देणारी व लाभदायक व्हावी या साठी पाझर तलावाचे संपादन करण्यात आलेले आहे. सदरचा प्रकल्प हा दुर्गम व सखोल शेतजमीनीवर असून त्यास शेतकऱ्यांनी संमती दिली आहे. यामध्ये कोणतेही वस्ती अथवा गावठाण बाधीत होत नसल्यामुळे अथवा कोणतीही व्यक्ती विस्थापीत होत नसल्यामुळे पुनर्वसन करण्याची आवश्यकता नाही.

अनुसूची -४

(सामाजिक परिणाम निर्धारणाचा सारांश)

लागु नाही

टिपः- उक्त जमिनीच्या नकाशाचे वर्णन **उपविभागीय अधिकारी भोकरदन ता. भोकरदन जि. जालना** यांचे कार्यालयात निरीक्षणा करीता ठेवण्यात आला आहे.

ठिकाण :- भोकरदन

दिनांकः- १२/०५/२०२६

बी.सरवनन, भा.प्र.से.
सहायक जिल्हाधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी भोकरदन.

११

सहायक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी भोकरदन. यांजकडून

भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अन्वये कलम १९ (१) ची

अधिसुचना

क्रमांक २०२२/उविअ/भुस/सम-२/सिआर-८०/२२.- दिनांक २२/०७/२०२२. ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या जालना जिल्ह्याच्या जिल्हाधिका-याने, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) यात यापुढे ज्याचा निर्देश **उक्त अधिनियम** असा केला आहे, यांच्या कलम ११ च्या पोट कलमाव्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, अधिसुचना, **दिनांक ३०/०१/२०२६ अन्वये प्रारंभिक अधिसूचना** काढली आहे व शासन राजपत्रामध्ये **दिनांक १२/०२/२०२६** रोजी प्रसिध्दी देण्यात आली आहे.

त्याव्दारे असे अधिसुचित केले आहे की, या सोबत जोडलेल्या **अनुसूचि एक** मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेल्या जमिनीची, **अनुसूची दोन** मध्ये अधिक तपशिलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे. किंवा त्यांची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

जालना जिल्हयातील जिल्हाधिकारी जालना **कलम १५ च्या पोटकलम (२)** अन्वये दिलेला अहवाल,कोणता ही असल्यास,विचारात घेतल्या नंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीनीची संपादीत करण्याची आवश्यकता आहे, या बाबत त्याची खात्री पटली आहे म्हणुन,उक्त अधिनियमाच्या **कलम १९ च्या पोटकलम (१)** च्या तरतुदी मध्ये उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीनीची आवश्यकता आहे. असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

ज्याअर्थी, **अनुसूची तीन** मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधीत कुटूंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतच्या प्रयोजनासाठी पुनर्वसन क्षेत्र म्हणुन निर्धारीत केले असल्याचे या द्वारे घोषित केले असून पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेच्या सारांश **अनुसूची चार** मध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या **कलम ३ (छ)** अन्वये सुचीत शासन असलेला जिल्हाधिकारी हे उक्त अधिनियमा मध्ये जिल्हाधिकारी यांची कर्तव्ये पार पाडण्यासाठी **उपविभागीय अधिकारी भोकरदन** यांना अधिसुचना काढण्यापुर्वी पदनिर्देशित करीत आहे.

अनुसूची -१

(जमीनीचे वर्णन)

गावाचे नावः- पा.त.क्र.१२ मौजे-गोषेगांव ता. भोकरदन जि. जालना

अ.क्र.	भुसंपादन किंवा गट क्रमांक	मोजणी प्रमाणे क्षेत्र (हे.आर.मध्ये)
१	२६४	०.३९
२	२६४	०.२०
३	३२६	०.०२
४	३२६	०.१९
	एकुण	०.८०

अनुसूची -२

प्रकल्पाचे नांव : पाझर तलाव क्र. १२ मौ. गोषेगाव ता. भोकरदन जि. जालना या प्रकल्पा करीता

प्रकल्पकार्याचे वर्णन : पाझर तलाव क्र. १२ मौ. गोषेगाव ता. भोकरदन जि. जालना येथील जमीन पाझर तलाव करिता संपादना बाबत.

समाजास मिळणारा लाभ : या प्रकल्पामुळे **मौ. गोषेगाव ता. भोकरदन जि. जालना** येथील जमीन ओलीतीखाली येणार आहे. या प्रकल्पामुळे त्या लाभक्षेत्रातील जमीनीचे पाणीपातळी भरपूर प्रमाणत वाढ होणार आहे तसेच गावाच्या पिण्याचा पाण्याचा जनावराच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागणार आहे. या पाझर तलावाच्या कामामुळे रोजगारांची संधी मिळणार आहे. तसेच संपादना क्षेत्रालगतची जमीन ओलीत होणार असुन प्राप्त होणाऱ्या उत्पन्नात लक्षणी वाढ होणार आहे व पर्यायाने खेड्यातील जीवनमानामध्ये सुधारणा होणार आहे.

अनुसूची -३

बाधीत व्यक्तीचे विस्थापन कररण्यात भाग पाडणारी कारणे – सदरचा प्रकल्प हा सिंचन क्षेत्रातील जमीन अधीकाधीक फायदेशीर उत्पन्न देणारी व लाभदायक व्हावी या साठी पाझर तलावाचे संपादन करण्यात आलेले आहे. सदरचा प्रकल्प हा दुर्गम व सखोल शेतजमीनीवर असून त्यास शेतकऱ्यांनी संमती दिली आहे. यामध्ये कोणतेही वस्ती अथवा गावठाण बाधीत होत नसल्यामुळे अथवा कोणतीही व्यक्ती विस्थापीत होत नसल्यामुळे पुनर्वसन करण्याची आवश्यकता नाही.

अनुसूची -४

(सामाजिक परिणाम निर्धारणाचा सारांश)

लागु नाही

टिपः- उक्त जमिनीच्या नकाशाचे वर्णन **उपविभागीय अधिकारी भोकरदन ता. भोकरदन जि. जालना** यांचे कार्यालयात निरीक्षणा करीता ठेवण्यात आला आहे.

ठिकाण :- भोकरदन

दिनांकः- १२/०५/२०२६

बी.सरवनन, भा.प्र.से.
सहायक जिल्हाधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी भोकरदन.

१२

उपजिल्हाधिकारी (भूसंपादन)लसिका नांदेड, यांजकडून
प्रारंभिक अधिसूचना कलम ११
भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३
दि.१७/०४/२०२६

क्र.२०२१/उपजि/लसिका/सिआर-२५.— ज्याअर्थी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंडा (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसुचना, महसूल व वनविभाग क्रमांक संकिर्ण-११/ २०१४/प्र.क्र.७७/अ-२ दिनांक १९-०१-२०१५ (यात यापुढे जिचा निर्देश **उक्त अधिसुचना** असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील १०००० हेक्टर पेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता भूमिसंपान करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानन्यात येईल.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, नांदेड जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यास या सोबत जोडलेल्या अनुसूचित एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश **उक्त जमीन** असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे जिचा निर्देश **उक्त सार्वजनिक प्रयोजन** असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते, ज्याच्या स्वरूपाचे विवरण या सोबत जोडलेल्या अनुसुचि दोन मध्ये दिलेले आहे, आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसुचित करण्यात येते की, उक्त जमीनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावीत भूमिसंपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, या सोबत जोडलेल्या अनुसूचि तीन मध्ये दिलेली आहेत. आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश या सोबत जोडलेल्या अनुसूचि चार मध्ये दिलेला आहे,

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल, यासोबत जोडलेल्या अनुसूचि पाच मध्ये दिलेला आहे.

त्या अर्थी आता, असे घोषित करण्यात येते की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसुचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खाली कार्यवाही पुर्ण होईल त्या कालावधी पर्यंत उक्त जमीनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमीनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतू, उक्त जमीनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमुद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातुन सुट देता येईल.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ पोट कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी भूसंपादन, पुनर्वसन व पूनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २०१४ (यात यापुढे जिचा निर्देश **उक्त नियम** असा करण्यात आला आहे) यांच्या नियम १० च्या उप नियम (३) द्वारे विहीत केल्याप्रमाणे भूमिअभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पुर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्य पार पाडण्यासाठी **उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) लसिका नांदेड** जिल्हा नांदेड यास पदनिर्देशित केले आहे.

अनुसूची एक

संपादीत करावयाच्या जमीनीचे वर्णन

गाव :चिंचोली (प.ऊ.)ता.लोहा जि.नांदेड

अ.क्र.	**भुमापन किंवा गट क्रमांक**	**क्षेत्र (हे.आर.मध्ये)**
१	१	०.०२
२	१	०.०२
३	१८७	०.१८
	एकुण	०.२२

अनुसूची दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपा बाबत विवरण

प्रकल्पाचे नांव : भुसंपादन प्रस्ताव आमदुरा उच्च पातळी बंधा-याच्या बुडीत क्षेत्रासाठी चिंचोली (प.ऊ.)ता.लोहा जि.नांदेड

प्रकल्प कार्यालचे वर्णन : कार्यकारी अभियंता विष्णुपूरी प्रकल्प विभाग क्र.२ नांदेड

अनुसूची तीन

बाधीत व्यक्तीचे विस्थापन होत नाही.

अनुसूची चार

(सामाजिक प्रभाव निर्धारण आभ्यास करणा-या अभिकरणाने दिलेला)

सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश लागु नाही.

अनुसूची पाच

(नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील)

भूधारकाचे विस्थापन होत नसल्यामुळे प्रशासक नियूक्ती लागु नाही.

टिपः- उक्त जमीनीच्या आराखड्याचे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) लसिका नांदेड यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

दिनांकः- १७/०४/२०२६

ठिकाणः- नांदेड

(प्रियांका पवार)
उपजिल्हाधिकारी (भूसंपादन)
लसिका नांदेड.

१३

उपजिल्हाधिकारी (भूसंपादन)लसिका नांदेड, यांजकडून

प्रारंभिक अधिसूचना कलम ११

भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित

भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क

अधिनियम, २०१३

दि.२९/०४/२०२६

क्र.२०२४/उपजि/लसिका/सिआर-११.– ज्याअर्थी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंडा (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसुचना, महसूल व वनविभाग क्रमांक संकिर्ण-११/ २०१४/प्र.क्र.७७/अ-२ दिनांक १९-०१-२०१५ (यात यापुढे जिचा निर्देश **उक्त अधिसुचना** असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील १०००० हेक्टर पेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता भूमिसंपान करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानन्यात येईल.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, नांदेड जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यास या सोबत जोडलेल्या अनुसूचित एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश **उक्त जमीन** असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे जिचा निर्देश **उक्त सार्वजनिक प्रयोजन** असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते, ज्याच्या स्वरूपाचे विवरण या सोबत जोडलेल्या अनुसुचि दोन मध्ये

दिलेले आहे, आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसुचित करण्यात येते की, उक्त जमीनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावीत भूमिसंपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, या सोबत जोडलेल्या अनुसूचि तीन मध्ये दिलेली आहेत. आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश या सोबत जोडलेल्या अनुसूचि चार मध्ये दिलेला आहे,

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल, यासोबत जोडलेल्या अनुसूचि पाच मध्ये दिलेला आहे.

त्या अर्थी आता, असे घोषित करण्यात येते की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसुचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खाली कार्यवाही पुर्ण होईल त्या कालावधी पर्यंत उक्त जमीनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमीनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतू, उक्त जमीनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमुद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातुन सुट देता येईल.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ पोट कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी भूसंपादन, पुनर्वसन व पूनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २०१४ (यात यापुढे जिचा निर्देश **उक्त नियम** असा करण्यात आला आहे) यांच्या नियम १० च्या उप नियम (३) द्वारे विहीत केल्याप्रमाणे भूमिअभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पुर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्य पार पाडण्यासाठी **उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) लसिका नांदेड** जिल्हा नांदेड यास पदनिर्देशित केले आहे.

अनुसूची एक

संपादीत करावयाच्या जमीनीचे वर्णन

गाव :भोकर ता.भोकर जि.नांदेड

अ.क्र.	भुमापन किंवा गट क्रमांक	क्षेत्र (हे.आर.मध्ये)
१	१३५	०.२९
२	१३५	०.९७
३	१३५	०.६३
४	१३५	०.१८
	एकुण	२.०७

अनुसूची दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपा बाबत विवरण

प्रकल्पाचे नांव : भुसंपादन प्रस्ताव निवासी शाळा बांधकामासाठी मौ.भोकर ता.भोकर जि.नांदेड

प्रकल्प कार्यालचे वर्णन : कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग भोकर

अनुसूची तीन

बाधीत व्यक्तीचे विस्थापन होत नाही.

अनुसूची चार

(सामाजिक प्रभाव निर्धारण आभ्यास करणा-या अभिकरणाने दिलेला)

सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश लागु नाही.

अनुसूची पाच

(नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील)

भूधारकाचे विस्थापन होत नसल्यामुळे प्रशासक नियूक्ती लागु नाही.

टिपः- उक्त जमीनीच्या आराखड्याचे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) लसिका नांदेड यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

दिनांकः- २९/०४/२०२६

ठिकाणः- नांदेड

(प्रियांका पवार)
उपजिल्हाधिकारी (भूसंपादन)
लसिका नांदेड.

१४

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, बीड यांजकडून

संदर्भ १ मा. प्रबंधक (निरीक्षणे-१), उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र क्र. ब (जन)-१००१/२०२४/१४०४ दिनांक ६/०८/२०२४.

२ महा. शासन, विधी व न्याय विभाग, मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्र. संकिर्ण-२०२४/प्र.क्र.९०/का. ६, दिनांक २६/७/२०२४.

३ महा. शासन, राजपत्र असाधारण भाग चार-अ, वित्त विभाग यांचे दिनांक ३० जानेवारी २०१९ रोजीची अधिसूचना.

जा.क्र./प्रशा/२८३५/२०२६.- उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, सातव्या वेतन आयोग संदर्भातील महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-अ, वित्त विभाग यांचे दिनांक ३० जानेवारी २०१९ चे अधिसुचनेतील पृष्ठ क्र. १७४ वर (१३) विधी व न्याय विभाग या शिर्षाखाली नमुद ४, जिल्हा न्यायाधीश, जिल्हा व सत्र न्यायालय, (ग्रामीण) या मथळयाखाली अ.क्र. ९ आणि ११ वर राजपत्रीत या तक्यामध्ये प्रबंधक, जिल्हा न्यायालय आणि अधीक्षक, जिल्हा न्यायालय या पदनामाचा समावेश दर्शविलेला आहे.

त्याअनुषंगाने बीड न्यायिक जिल्हयातील खालील दर्शविलेल्या अधिक्षक यांना राजपत्रित वर्ग-२ चा दर्जा असल्याबाबतची अधिसूचना राजपत्रात प्रसिध्द करण्याचे अनुषंगाने कर्मचाऱ्यांची नावे आपल्याकडे पाठविण्यात येत आहेत.

अ.क्र.	कर्मचाऱ्याचे नांव	पदनाम
१	श्रीमती उषा नंदकिशोर द्रुकर (रोटे)	अधिक्षक
२	श्रीमती ज्योती पंडीतराव वाघमारे	अधिक्षक
३	श्री. त्रिंबक भगवानराव कवडे	अधिक्षक
४	श्री. शिवाजी भगवानराव तुपे	अधिक्षक
५	श्री. राजेश नारायणराव देशमुख	अधिक्षक
६	श्री. शामसुंदर नरेंद्रसिंग ठाकुर	अधिक्षक
७	श्री. विजयकुमार रामलींग होनराव	अधिक्षक

तरी उपरोक्त अधिक्षक यांची नावे राजपत्रित वर्ग-२ म्हणून शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द करण्यात यावीत व सदर राजपत्राची एक प्रत या कार्यालयास पाठवावी ही विनंती.

आपला विश्वासु,

(आनंद एल. यावलकर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, बीड.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR RUPENDRA DINESH MORE. PRINTED AT GOVERNMENT PRESS, PAITHAN ROAD, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR-431 005 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR RUPENDRA DINESH MORE.

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

प्राधिकृत प्रकाशन

वर्ष १२ वे, राजपत्र क्र. १२] गुरुवार ते बुधवार, मे २१-२७, २०२६ : वैशाख/ज्येष्ठ ३१-६, शके १९४८ [किंमत : ०.०० रुपये

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

भाग एक-अ-छत्रपती संभाजीनगर विभागीय पुरवणी

(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्याव्यतिरिक्त केवळ छत्रपती संभाजीनगर विभागाशी संबंधित असलेले व महाराष्ट्र नगरपालिका, जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, जिल्हा नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना)

टीप :-प्रत्येक अधिसूचनेच्या आधी मधोमध जे ठळक आकडे छापलेले आहेत ते ह्या साप्ताहिक राजपत्रात छापलेल्या अधिसूचनांचे अनुक्रमांक आहेत.

मुख्याधिकारी नगर परिषद, धाराशिव यांजकडून

जाहीर सूचना

महाराष्ट्र प्रादेशीक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये सूचना

जाहीर सूचना

दि. १३/०५/२०२६

जा.क्र.२०६५/२०२६ .– ज्याअर्थी धाराशिव शहराची (दुसरी सुधारीत विकास योजना) महाराष्ट्र प्रादेशीक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ३१ (१) अन्वये महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाची अधिसुचना क्र. टीपीएस-३४०९/१२५६/सी-आर/२९९/२००९/नवि-३० दि. ०४ एप्रिल २०१२ अन्वये मंजुर झाली असुन, ती दि. १५/०५/२०१२ पासुन अंमलात आली आहे.

ज्याअर्थी, धाराशिव नगर परिषदेने सर्वसाधारण सभा ठराव क्र. ४८ दि. २८/०४/२०२६ अन्वये मंजुर विकास योजनांमध्ये उक्त अधिनियमाच्या कलम ३७ अन्वये खालील फेरबदल करावयाचे ठरविले आहे.

मंजुर विकास योजनेनुसार प्रयोजन

धाराशिव शहराच्या मंजुर विकास योजनेतील सर्वे नं. २४० मधील आरक्षण क्र. ९४-वाहनतळ (अंदाजे क्षेत्रफळ २० आर) (भाग नकाशात दर्शविल्याप्रमाणे)

प्रस्तावित फेरबदल

धाराशिव शहराच्या मंजुर विकास योजनेतील सर्वे नं. २४० मधील आरक्षण क्र. ९४- वाहनतळ ऐवजी (अंदाजे क्षेत्रफळ २० आर) आरक्षण क्र. ९४- व्यापारी संकुल असा बदल करणे. (भाग नकाशात दर्शविल्याप्रमाणे)

वरील बदल विकास योजनेच्या भाग नकाशावर लाल रंगात दर्शविण्यात आलेले आहेत आणि ज्याअर्थी उक्त फेरबदला बाबत जनतेकडून सूचना व हरकती मागविण्याकरीता उक्त अधिनियमाच्या कलम ३७ (१) अन्वये सूचना प्रसिध्द करण्यात येत आहे. त्या अर्थी जे नागरिक ही सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द झाल्यापासुन एक महिन्याच्या आत त्यांच्या सुचना आणि हरकती लेखी स्वरुपात धाराशिव नगर परिषद धाराशिव कार्यालयात सादर करतील. त्यांचा विचार उक्त प्रस्ताव शासनाकडे अंतिम मंजुरीसाठी सादर करणेपुर्वी धाराशिव नगर परिषद करेल.

उक्त विकास योजनेत प्रस्तावित केलेला फेरबदल दर्शविणारा भाग नकाशा नागरीकांच्या अवलोकनार्थ नगर परिषदेच्या कार्यालयात सर्व कामकाजाचे दिवशी कार्यालयीन वेळेत उपलब्ध असेल.

ठिकाणः नगर परिषद कार्यालय, धाराशिव

दिनांक : १३/०५/२०२६

निता अंधारे,
मुख्याधिकारी नगर परिषद, धाराशिव.

BY THE CHIEF OFFICER MUNICIPAL COUNCIL, DHARASHIV

Public Notice Under Section 37 of Maharashtra Regional and Town Planning Act 1966.

DT. 13/05/2026

Public Notice

OWD.NO.2065/2026.-- Whereas the development plan of Dharashiv has been sanctioned by the Government of Maharashtra Urban Development No. TPS-3409/1256/CR/299/ 2009/UD-30 Dt. 04/04/2012 and came into effect from Dt. 15/05/2016.

Whereas the Dharashiv Municipal Council under its General Body meeting Date 28/04/2026 *wide* resolution No. 48 has resolved to effect the following modification under section 37 of the Maharashtra regional and town planning Act 1966 (hereinafter referred to as the "said Act") in the above mentioned second revised plan viz.

Provision as per sanctioned D.P.

Land Admeasuring tentatively 20 R. in Sy. No. 240 are in reservation no. 94- Parking (As shown in part plan)

Proposed modification

In the approved development plan of Dharashiv City, reservation no. 94- Parking (approximate area 20 R) in survey no. 240 shall be changed to reservation no. 94- Commercial Complex. (As shown in the part plan)

And whereas, the notice is here by published as required under section 37 of the said Act for inviting suggestions and objections from the public on this modification. Those persons who will give their suggestions and objections in writing to the Dharashiv municipal council within one month from the publication of this notice, in Maharashtra Government Gazette will be considered by the council before submitting the said proposal to Government for sanction.

The part plan showing the proposed modification to the said development plan in kept open for inspection of public in the office of Dharashiv Municipal Council on all the working days.

Place: Dharashiv
Date: 13/05/2026.

Nita Andhare,
Chief Officer,
Municipal Council, Dharashiv.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR RUPENDRA DINESH MORE. PRINTED AT GOVERNMENT PRESS, PAITHAN ROAD, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR-431 005 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR RUPENDRA DINESH MORE.